# ८ केंद्र शासन

## अ) कृषि पणनाच्या पायाभूत सुविधा उभारणीसाठी

- योजनेची सुरुवात २० ऑक्टोबर २००४
- उद्देश - पणन व्यवस्थेच्या बळकटीकरण व आधुनिकीकरणासाठी सुविधा. उदा. शेतमालासाठी लिलाव गृहे, लिलाव ओटे, धान्य सफाई व हाताळणी यंत्रणा, शितगृह, पॅकेजींग युनिट्स इ.
- लाभार्थी - वैयक्तिक शेतकरी/उत्पादक/ग्राहक संघ/ सहकारी संस्था/कृषि उत्पन्न बाजार समित्या इ.
- अनुदान - खर्चाच्या २५ टक्के (डोंगराळ आणि आदिवासी भाग - ३३.३३ टक्के)
- अनुदान कमाल मर्यादा वैयक्तिक रु. ५० लाख.
- अनुसूचित जाती/जमाती कमाल मर्यादा रु. ६० लाख.
- कृषि उत्पन्न बाजार समित्या व कृषि पणन मंडळे यांना अनुदानासाठी कमाल मर्यादा नाही.

## ब) ग्रामिण गोदाम योजना

- केंद्र शासनाचे कृषि विपणन सल्लागार, (डी.एम.आय.) यांची नाबार्डमार्फत देशाचे ग्रामीण भागात (महानगरपालिका कार्यक्षेत्राचे बाहेर) धान्य साठवणुकीचे नवीन गोदाम उभारण्यासाठी व अस्तित्वातील गोदामाची दुरुस्ती/क्षमतावाढीसाठी बांधकाम खर्चाच्या २५% अनुदान योजना.
- **उद्देश :** ग्रामीण भागात अन्नधान्याची शास्त्रोक्त पद्धतीने साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी ग्रामीण गोदाम योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे धान्य, प्रक्रिया केलेले शेती उत्पादन, ग्राहकोपयोगी वस्तू तसेच कृषि उत्पादनाशी निगडीत आवश्यक साधन-सामुग्री साठवणुकीची गरज भागविणे, शेती उत्पादनाचे प्रतवारी, प्रमाणीकरण व गुणनियंत्रण यास उत्तेजना देऊन त्याच्या पणन/विक्री व्यवस्थेस चालना देणे, कृषि उत्पादनाच्या सुगीच्या काळात कमी बाजारभावाने होणाऱ्या विक्रीस आळा घालणे, पणन व्यवस्थेत शेतकऱ्याची प्रतवारी पत सुधारणा करून देशातील शेतकरी व कृषि पणन व्यवस्थेस बळकटी प्राप्त होणेसाठी गोदामात साठविलेल्या शेतमालाच्या गोदाम पावतीवर वित्त पुरवठ्यासाठी शेतमाल तारण कर्ज उपलब्ध करून देणे.
- योजना अंमलबजावणीचे सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार योजना दि. ३१ मार्च २०१२ पर्यंत अस्तित्वात राहणार.
- **पात्र लाभार्थी :** वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांचा समूह, कृषि पदवीधर, भागीदारी, मालकी हक्क फर्म, स्वयंसहायता गट, कंपन्या, सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषि पणन मंडळे, कृषि प्रक्रिया महामंडळे, वखार महामंडळे इ.
- **गोदामाचे ठिकाण व आकार :** प्रस्तावधारकास महानगरपालिका कार्यक्षेत्राचे बाहेर गोदाम उभारणीसाठी त्याचे इच्छेनुसार गोदामाची क्षमता ठरविण्याचे स्वातंत्र्य, मात्र अनुदानासाठी गोदामाची क्षमता किमान १०० मे. टन व जास्तीतजास्त १०,००० मे. टन आवश्यक.
- **उद्दिष्ट :** सुधारीत योजनेअंतर्गत ८५ लाख मे. टन क्षमतेच्या नवीन गोदामांची उभारणी व ५ लाख मे. टन क्षमतेच्या गोदामांची दुरुस्ती करण्याचे (एकूण १० लाख मे. टन) उद्दिष्ट. (एकूण क्षमतेपैकी ५ लाख मे. टन क्षमता लहान शेतकरी व ५ लाख मे. टन क्षमता सहकारी संस्थांसाठी आरक्षित)

- **अनुदान :**

  १) उत्तर-पूर्वेकडील राज्ये, डोंगरी भाग आणि महिला व त्यांचे स्वयंसहाय्यता गट/त्यांच्या सहकारी संस्था, अनुसूचित जाती/जमातीचे प्रस्तावधारक व त्यांचे स्वयंसहाय्यता गट/त्यांच्या सहकारी संस्था यांना प्रकल्प खर्चाच्या ३३.३३ टक्के अनुदान देय.

  २) शेतकरी व त्यांचे गट, संस्था, कृषि पदवीधर, सहकारी आणि केंद्रिय/राज्य वखार महामंडळे इ. ना प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के अनुदान देय.

  ३) वरील व्यतिरिक्त इतर वैयक्तिक प्रस्तावधारक, महामंडळे इ. ना. एकूण प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के अनुदान देय आहे.

  ४) राष्ट्रीय सहकारी निगम (एन.सी.डी.सी.) कडून अनुदान घेऊन ज्या सहकारी संस्थांनी गोदामांची उभारणी केलेली आहे त्यांचे गोदाम दुरुस्तीसाठी प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या २५ टक्के अनुदान देय.

- **योजनेची आर्थिक गुंतवणूक :**

  १) २५% - शासकीय अनुदान-(वरील क्र. १ साठी ३३.३३%, इतरांसाठी १५%)

  २) २५% - स्वनिधी (वरील क्र. १ साठी २०%, इतरांसाठी ३५%)

  ३) ५०% - बँक कर्ज (राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, सहकारी बँका) (वरील क्र. १ साठी ४६.६७%)

- **उभारणी खर्च :**

  १) १००० मे.टन पर्यंतच्या क्षमतेसाठी रु. २५०० प्रती मे.टन क्षमता

  २) १००० मे.टन पेक्षा जास्त क्षमतेसाठी रु. १८७५ प्रती मे.टन क्षमता

  (जागेची किंमत प्रकल्प खर्चाच्या १०% पर्यंत धरून ती प्रस्तावधारकाची स्व-गुंतवणूक म्हणून धरण्यात येते.)

- **प्रस्तावाची कागदपत्रे :** १) अर्ज, २) ७/१२ व ८ अ उतारा, ३) ग्रामपंचायत/नगर परिषद ना हरकत प्रमाणपत्र, ४) इस्टीमेट व प्लॅन, सहकारी संस्थांसाठी ५) संचालक मंडळ ठराव, ६) लेखापरिक्षण अहवाल ७) मागील तीन वर्षाची आर्थिक पत्रके (कर्ज/अनुदानाचे प्रस्ताव बँकेकडील फॉर्ममध्ये सर्व कागदपत्रांची पूर्तता करून सात प्रतीमध्ये तयार करून सादर करणे आवश्यक.)

: : :